RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक १७] **मंगळवार, सप्टेंबर १, २०२६/भाद्रपद १०, शके १९४८** **[पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००**

असाधारण क्रमांक २२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

नगरविकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर, २०२६.

अधिसूचना

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८.

क्रमांक बीएमसी-२५२६/प्र.क्र.१०३३/नवि-२१.—ज्याअर्थी, श्रीम. विशाखा शरद राऊत (श्रीमती विशाखा मोरेश्वर राऊळ) यांनी सन २०२६ मध्ये झालेली बृहन्मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक लढविली असून, त्या नागरिकांच्या मागासवर्गाकरिता राखीव असलेल्या जागेवर प्रभाग क्रमांक १९१ मधून नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या;

आणि ज्याअर्थी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघर यांनी आपल्या दिनांक २० ऑगस्ट, २०२६ च्या आदेशान्वये श्रीम. विशाखा शरद राऊत (श्रीमती विशाखा मोरेश्वर राऊळ) यांचे जात प्रमाणपत्र रद्द केले आहे;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३), च्या कलम १६ च्या पोट-कलम (१क) च्या खंड (अ) अनुसार, श्रीम. विशाखा शरद राऊत (श्रीमती विशाखा मोरेश्वर राऊळ) हे नगरसेवक पदासाठी अपात्र ठरल्याने, त्यांची नगरसेवक पदाची जागा रिक्त झाली आहे.

त्याअर्थी, आता, मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३), च्या कलम १६ च्या पोट-कलम (१क) च्या खंड (ब) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे श्रीम. विशाखा शरद राऊत (श्रीमती विशाखा मोरेश्वर राऊळ) यांना दिनांक २० ऑगस्ट, २०२६ पासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी नगरसेवक म्हणून निवडून येण्यास किंवा राहण्यास अपात्र ठरवत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विद्या हम्पय्या,
शासनाचे सहसचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 1st September, 2026.

NOTIFICATION

Mumbai Municipal Corporation Act, 1888.

No. BMC-2526/C.R.1033/UD-21.—Whereas, Smt. Vishakha Sharad Raut (Smt. Vishakha Moreshwar Raul) has contested the general elections of the Municipal Corporation of Brihan Mumbai held in the year 2026 and was declared elected as a Councillor from Ward No. 191 on a seat reserved for the person belonging to Backward Class of Citizens;

And whereas, the District Caste Certificate Scrutiny Committee, Palghar has *vide* its Order dated the 20th August, 2026 cancelled the Caste Certificate of Smt. Vishakha Sharad Raut (Smt. Vishakha Moreshwar Raul);

And whereas, Smt. Vishakha Sharad Raut (Smt. Vishakha Moreshwar Raul) having been disqualified for being a Councillor under clause *(a)* of sub-section (*1C*) of section 16 of the Mumbai Municipal Corporation Act (III of 1888), his seat as such Councillor have become vacant.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(b)* of sub-section (*1C*) of section 16 of the Mumbai Municipal Corporation Act (III of 1888) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby disqualifies Smt. Vishakha Sharad Raut (Smt. Vishakha Moreshwar Raul) for being elected or being a Councillor for a period of six years from the 20th August, 2026.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIDYA HAMPAYYA,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.